MHAU050051082025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९५/२०२५**

**सुलभा नंदकुमार थावरे**

**वि.**

**निरंक.**

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार यांचा मुलगा नामे आशिष नंदकुमार थावरे हा दि. १७.१२.२०२४ रोजी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय धाराशिव, धाराशिव येथे मयत झाला आहे. तसेच मयत आशिष नंदकुमार थावरे याची पत्नी अपर्णा आशिष थावरे ही देखील दि. २१.०७.२०२४ रोजी सुविधा आय.सी.यु. अॅण्ड कॅथ लॅब सेंटर, बार्शी, सोलापूर येथे मयत झाली आहे. मयत आशिष नंदकुमार थावरे यांना अर्जदार हिच कायदेशीर वारस असून तिचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार हिस सरकारी कार्यालयीन कामाकरीता वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे झालेले आहे; म्हणून सदरचा अर्ज अर्जदार हिने मयत आशिष नंदकुमार थावरे यांचे कायदेशीर वारस असल्याचे ठरवून मिळण्याकरीता दाखल केला आहे.

३. अर्जदारांनी अर्ज दाखल केल्यानंतर अर्जाची जाहीर सुचना व जाहीर

प्रकटन दिल्याप्रमाणे दैनिक ''मराठवाडा केसरी'' या वृत्तपत्रात दि. ०९.१२.२०२५ रोजी प्रकाशित करण्यात आले व अर्जाबद्दल काही आक्षेप असल्यास न्यायालयास कळविण्यास सांगितले, परंतू अद्याप न्यायालयास कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही.

४. अर्जदारांतर्फे विधिज्ञ रामकृष्ण बोडखे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकामी खालील मुद्दे अर्जाच्या निकाल निश्चिती करीता उपस्थित झाले. त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही मयत आशिष नंदकुमार थावरे यांची कायदेशीर वारस असून वारसाचा दाखला मिळण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः–**

६. अर्जदार हिने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन कथन केले की, अर्जदार ही मयत आशिष नंदकुमार थावरे यांची कायदेशीर वारस आहे. सदर अर्जासोबत दस्तऐवज यादी सोबत अर्जदार हिने मयत आशिष नंदकुमार थावरे व मयत अपर्णा आशिष थावरे यांचे मुळ मृत्यु प्रमाणपत्राची व आधार कार्डची स्कॅन प्रत व अर्जदारचे

आधार कार्डची स्कॅन प्रत दाखल केलेली आहे. तसेच अर्जदार हिने मयत नंदकुमार श्रीनिवास थावरे यांचे मुळ मृत्यू प्रमाणपत्राची स्कॅन प्रत दाखल केली आहे. तद्नंतर अर्जदाराने पुरसीस दाखल करून त्यांचा पुरावा बंद केला आहे.

७. अर्जदाराने दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदारातर्फे दाखल करण्यात आलेला लेखी पुरावा हा तोंडी पुराव्यास पुरक असून अबाधित आहे. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज व जाहीर प्रकटन दाखल केल्यानंतर कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने दाखल केलेल्या पुराव्याचे शपथपत्रामध्ये अर्जदार ही मयत आशिष नंदकुमार थावरे यांचे वारस असून त्यांना इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. वरील कथने विचारात घेता मयत आशिष नंदकुमार थावरे यांचे अर्जदार हिच कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते.

८. अर्जदाराने अभिलेखावरती दाखल केलेल्या उपरोक्त पुराव्याबाबत शंका घेण्याची परिस्थिती दिसून येत नाही. तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता मयत आशिष नंदकुमार थावरे यांचे अर्जदार हिच कायदेशीर वारस असल्याचा निष्कर्ष काढण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>**

९. मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने अर्जदार ही मयत आशिष

नंदकुमार थावरे यांची कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र ठरलेले आहे. परिणामतः अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता मुद्दा क्र.२ चे उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार नामे सुलभा नंदकुमार थावरे हिच मयत आशिष नंदकुमार थावरे याची कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

३. वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याकरीता अर्जदार यांनी नियमाप्रमाणे योग्य ते न्यायालयीन शुल्क न्यायालयात जमा करावे.

Digitally signed by SHAZIYA KHAN
Date: 2026.03.12 17:19:12 +0530

दिनांकः १२.०३.२०२६ **(श्रीमती एस. के. खान)**

वैजापूर. २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वैजापूर.